जाहिरातीचा मसुदा
महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) सुधारीत अधिनियम,२०२१ मधील प्रकरण ५ मधील कलम २७ सेच महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम, २०१८ मधील नियम १५ (१) मध्ये बाल कल्याण समितीची स्थापना करण्याची तरतूद आहे, बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम,२०१८ चा नयम ९१ च्या अन्वये गठीत केलेल्या निवड समितीच्या शिफारशी नुसार बाल कल्याण समितीची स्थापना करण्यात येते.

त्यानुसार अध्यक्ष / सदस्य, बाल कल्याण समिती या पदांसाठी विहित पात्रतेचे निकष पूर्ण करणाऱ्या प्रशासकीय सदस्यांची नियुक्ती करिता पात्र उमेदवारांचे अर्ज मागविण्यात येत आहेत.

सदर जाहिरातीबाबतची जिल्हानिहाय नियुक्त करावयाची पदे या बाबतची माहिती, पात्रता, अटी व शर्ती या बाबतच्या अधिक माहितीसाठी www.maharashtra.gov.in या अधिकृत संकेत स्थळाला भेट द्यावी.

(राहुल मोरे)
आयुक्त
महिला व बाल विकास
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

## महाराष्ट्र शासन
## महिला व बाल विकास विभाग

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम,२०१५ मधील प्रकरण ५ मधील कलम २७ तसेच महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम, २०१८ मधील नियम १५ (१) मध्ये बाल कल्याण समितीची स्थापना करण्याची तरतूद आहे, बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम,२०१८ चा नियम ९१ च्या अन्वये गठीत केलेल्या निवड समितीच्या शिफारशी नुसार बाल कल्याण समितीची स्थापना करण्यात येते.

महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) (सुधारणा) नियम,२०२० दि.२८.१२.२०२० रोजीची अधिसुचना च्या अधिन राहुन अध्यक्ष/सदस्य बाल कल्याण समिती या पदांसाठी विहित पात्रतेचे निकष पूर्ण करणा-अशासकीय सदस्यांची नियुक्ती करिता दि.१०.०३.२०२१ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती.

तथापि,केंद्र शासनाने बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ च्या तरतुदींमध्ये सुधारणा / दुरूस्ती मंजुर केली असुन त्याबाबतची अधिसुचना दि.९.०८.२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) सुधारित अधिनियम २०२१ नुसार कलम २७ मध्ये बाल कल्याण समिती अध्यक्ष / सदस्य यांच्या निवडीच्या निकषामध्ये सुधारणा / दुरूस्ती करण्यात आली असुन ती पुढीलप्रमाणे
9. In section 27 of the principal Act

i) for sub-section (4), the following sub sections shall be substituted namely:-

" (4) No person shall be appointed as a member of a committee unless he has a degree in child psychology or psychiatry or law or social work or sociology or human health or education or human development or special education for differently abled children and has been actively involved in health education or welfare activities pertaining to children for seven years or is a practicing professional with a degree in child psychology or psychiatry or law or social work or sociology or human health or education or human development or special education for differently abled children .

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) सुधारित अधिनियम,२०२१ आणि नियम ९१ च्या अधिन राहून खालील नमुद जिल्हयाच्या ठिकाणी बाल कल्याण समिती अध्यक्ष/सदस्य यांची नियुक्ती करण्यासाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे.

**बाल कल्याण समिती जिल्हा निहाय नियुक्त करावयाची पदे व संख्या**

| अ. क्र. | जिल्हा | अध्यक्ष/सदस्य नियुक्त करावयाची पदे व संख्या | | | अ.क्र. | जिल्हा | अध्यक्ष/सदस्य नियुक्त करावयाची पदे व संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अध्यक्ष | सदस्य | एकूण | | | अध्यक्ष | सदस्य | एकूण |
| १ | पुणे | १ | ४ | ५ | १७ | अमरावती | १ | २ | ३ |
| | पुणे (वाढीव) | १ | ४ | ५ | १८ | अकोला | १ | २ | ३ |
| २ | सातारा | १ | ४ | ५ | १९ | वाशिम | १ | ३ | ४ |
| ३ | सांगली | १ | २ | ३ | २० | बुलढाणा | १ | ४ | ५ |
| ४ | सोलापूर | १ | २ | ३ | २१ | नागपूर | ० | ३ | ३ |
| ५ | कोल्हापूर | ० | ३ | ३ | २२ | वर्धा | १ | २ | ३ |
| ६ | मुंबई शहर | १ | ३ | ४ | २३ | चंद्रपूर | १ | ३ | ४ |
| | मुंबई शहर (वाढीव) | १ | ४ | ५ | २४ | गडचिरोली | १ | ३ | ४ |
| ७ | मुंबई उपनगर | १ | ४ | ५ | २५ | गोंदिया | ० | २ | २ |
| | मुंबई उपनगर (वाढीव) | ० | २ | २ | २६ | औरंगाबाद | १ | ३ | ४ |
| ८ | ठाणे | १ | ३ | ४ | २७ | जालना | १ | ३ | ४ |
| ९ | रायगड | १ | ४ | ५ | २८ | परभणी | १ | ४ | ५ |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | सिंधुदुर्ग | १ | ४ | ५ | २९ | हिंगोली | १ | ३ | ४ |
| ११ | रत्नागिरी | १ | ३ | ४ | ३० | लातूर | १ | ४ | ५ |
| १२ | नाशिक | १ | ४ | ५ | ३१ | नांदेड | १ | ३ | ४ |
| १३ | जळगाव | १ | ४ | ५ | ३२ | उस्मानाबाद | १ | २ | ३ |
| १४ | अहमदनगर | १ | ४ | ५ | ३३ | बीड | १ | ४ | ५ |
| १५ | धुळे | १ | २ | ३ | ३४ | पालघर | ० | २ | २ |
| १६ | नंदूरबार | १ | ३ | ४ | | | | | |

**उपरोक्त पदाबाबतचे पात्रतेचे निकष खालीलप्रमाणे आहेत त्याचप्रमाणे सदरची व्यक्ती खालील क्षेत्रातील नामांकित, कार्यक्षम व अनुभवी असावी.**

१. समितीचे अध्यक्ष / सदस्यांचे वय अर्जाच्या दिनांकास ३५ वर्षाहून कमी नसेल.

२. सदस्य हा बालमानसशास्त्र किंवा मनोविकृती चिकित्सा किंवा विधी किंवा समाजकार्य किंवा समाजशास्त्र किंवा मानव आरोग्य किंवा शिक्षण किंवा दिव्यागांचे विशेष शिक्षक यामधील पदवी आणि बालकासंबंधित आरोग्य, शिक्षण व कल्याण कार्याच्या क्षेत्रामधील किमान सात वर्षाचा सक्रीय सहभाग चा अनुभव असणारा किंवा बालमानसशास्त्र किंवा मनोविकृती चिकित्सा किंवा विधी किंवा समाजकार्य किंवा समाजशास्त्र किंवा मानव आरोग्य किंवा शिक्षण किंवा दिव्यागांचे विशेष शिक्षक या विषयातील व्यवसायिक कार्य करणारा व्यक्ती असावा.

३. समितीचे अध्यक्ष/सदस्य कमाल दोन सत्रापर्यंतच्या, जे सलग नसतील, नियुक्तीस पात्र असतील.

**अटी व शर्ती**

१. वर मुद्या क्र.१ व २ मध्ये नमूद केले नुसार वय, शैक्षणिक पात्रता व अनुभव असणे आवश्यक आहे.

२. महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम, २०१८ च्या नियम ९१ (६) प्रमाणे निवड समितीने निवडलेला सदस्य हा

(एक) अधिनियम व नियमानुसार ज्यामुळे समितीच्या कामाकरिता संपुर्ण वेळ व पूरेसे लक्ष देऊ शकणार नाही असे एखादे पूर्ण-वेळ पद धारण करणारा नसावा.

(दोन) तो समितीचा सदस्य असण्याच्या त्याच्या कार्यकाळात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कोणत्याही बालकांची काळजी घेणा-या संस्थेशी जोडलेला नसावा किंवा अशा संस्थेशी त्याचा अन्यप्रकारे हितसंबंध असता कामा नये.

(तीन ) त्यांच्या कार्यकाळात तो कोणत्याही राजकीय पक्षाच्या कार्यालयात कोणेतेही पद धारण करणार नसावा.

(चार ) दिवाळखोर नसावा.

३. निवड प्रक्रियेपूर्वी सर्व अर्जदारानी पोलीस विभागाकडून प्राप्त केलेले चारित्र्य प्रमाणपत्र सादर केले पाहिजे. नियम ९१ (५)

४. ज्या जिल्हयात सदस्य राहत असतील त्याच जिल्हयासाठीच सदस्यांनी अर्ज करावयाचा आहे

५. अर्जदारांना विहित नमुन्यातील हमीपत्रे/संमतीपत्रे देणे बंधनकारक राहील.

वर नमुद केलेल्या पदांसाठी दिलेल्या अटींची पुर्तता करणाऱ्या इच्छूक व्यक्तींनी आपले खालील विहित नमुन्यातील अर्ज वय, शैक्षणिक पात्रता, अनुभव आणि इतर तत्सम कागदपत्रासह जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसाचे आत आपले जिल्हयातील संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्या कार्यालयात दोन प्रतीत प्रस्ताव सादर करावेत.

**टिप-** यापुर्वी महिला व बालविकास विभागामार्फत दि.१०.०३.२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरतीच्या अनुषंगाने ज्या अर्जदारांनी विभागाकडे अर्ज सादर केले आहेत.अशा अर्जदारांनी पुन:श्च अर्ज सादर

करण्याची आवश्यकता नाही .तसेच अधिक माहितीसाठी संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.

तसेच सदरची जाहिरात शासनाच्या www.maharashtra.gov.in या अधिकृत संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

(राहुल मोरे)
आयुक्त
महिला व बाल विकास
महाराष्ट्र राज्य, पुणे

## महाराष्ट्र राज्यातील जिल्हयांसाठी बाल कल्याण समिती अध्यक्ष/सदस्य या पदावर नियुक्ती करणेबाबत इच्छूक व्यक्तींची नामनिर्देशन करण्यासाठी विहीत नमुन्यातील अर्ज

---

१. नाव

२. जन्मतारीख (वय)

३. पत्ता, दुरध्वनी / मोबाईल क्रमांक/ ई-मेल आय डी,

४. कोणत्या पदासाठी अर्ज करण्यात येत आहे:

५. शैक्षणिक अर्हता

| अ.क्र | शैक्षणिक पात्रता | वर्ष | विद्यापीठाचे नाव | विषय | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

६. शिक्षण, आरोग्य, व कल्याण कार्याचा क्षेत्रातील बालकांसोबत काम करण्याचा अनुभव याचा सविस्तर अहवाल

| अ.क्र. | अनुभव:-शिक्षण, आरोग्य, व कल्याण कार्याचा क्षेत्रातील (बालकांशी निगडित कार्याचा कालावधी) | कार्यालयाचे नाव | यंत्रणेचे नाव | पदाचे नाव | थोडक्यात कार्य |
|---|---|---|---|---|---|

७. नोकरी / व्यवसायाबाबत तपशील कार्यालयाचा पत्ता व दूरध्वनी क्रमांक.

८. अर्जदार व्यक्तीचे बाल कल्याण समिती वर काम करण्यासाठीचे संमतीपत्र.

९. अर्जदाराची इतर कोणत्याही समितीवर नियुक्ती झालेली आहे काय? असल्यास तपशील.